MHOS090006232026

## निशाणी क्र.१ खालील आदेश

(दिनांक ०३.०८.२०२६ रोजी घोषित)

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट,१८२७ मधील कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे:

अर्जदार हे मयत यांचे वारस आहेत. मयत शेषेराव हनुमंत डिकले हे दिनांक १०.०९.२००६ रोजी तांदुळवाडी ता. कळंब जि. धाराशिव येथे मयत झालेले आहेत. मयत शेषेराव हनुमंत डिकले यांच्या मृत्यू पश्चात अर्जदार नामे १) सखूबाई हनुमंत डिकले (आई), २) आशा शेषेराव डिकले (पत्नी), ३) दिपाली शेषेराव डिकले (मुलगी), ४) मनिषा शेषेराव डिकले (मुलगी), ५)सोनाली शेषेराव डिकले (मुलगी) हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या पाच वारसांव्यतिरिक्त अन्य कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत शेषेराव हनुमंत डिकले यांचे मृत्यूनंतर अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. अभिलेख वाचला. सदरील अर्जाच्या निर्णयाकरीता खालील मुद्दे माझे विचाराधीन येतात. सदर मुद्दयांचे निष्कर्ष, मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांनी विनंती केल्याप्रमाणे वारस दाखला | होय. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता:-**

**४.** अर्जदाराचे सन्माननीय विधीज्ञ श्री. बी.बी. कोळपे यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी आपल्या अर्जातील म्हणण्याच्या पृष्ठयार्थ त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक १० यांनी सादर केले असुन, त्यामध्ये अर्जदार क्र. १ यांनी शपथेवर अर्जातील नमुद मजकुर कथन केलेला आहे. या व्यतिरिक्त अर्जदार यांनी मयत शेषेराव हनुमंत डिकले यांचा मृत्यू दाखला निशाणी क्रमांक ११ वर दाखल केला आहे. तसेच अर्जदार यांच्या आधारकार्डची स्वसाक्षांकित प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यानंतर दिनांक १३.०५.२०२६ रोजीच्या '' दैनिक जनमत '' या वृत्तपत्राची जाहीर नोटीस निशाणी क्रमांक ९ वर दाखल केलेली आहे. तसेच अर्जदाराने पुरावा बंद करण्याची पुरसीस दाखल केली आहे.

**५.** अर्जदार क्र.१ यांनी निशाणी क्रमांक १० वर स्वत:करिता व स्वत:च्या वतीने अर्जामधील कथनांच्या पुष्ठ्यर्थ सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. मुळत:च अर्जात कोणी आक्षेप घेतला नसल्याने त्यांचा सरतपास अबाधित राहिला आहे. शपथपत्रातील कथने खोटी आढळल्यास त्याबाबतच्या शिक्षेस ते पात्र राहतील.

**६.** सदर प्रकरणामध्ये जाहीर नोटीसच्या अनुषंगाने कोणीही सदर प्रकरणात हजर होवून हरकत नोंदविलेली नाही. अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन कायद्याच्या तरतुदी प्रमाणे जाहीर प्रसिद्धीकरण दिनांक १८.०५.२०२६ न्यायालय कळंब, दिनांक

२५.०५.२०२६ रोजी ग्राम पंचायत कार्यालय, तांदुळवाडी, दिनांक १८.०५.२०२६ रोजी तहसिल कार्यालय, कळंब, येथे जनमत सर्वसामान्यांचे वर्तमानपत्र डकवून बजावणी केलेली आहे. उपरोक्त वर्तमानपत्रातील जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेकडून अर्जदार क्र. १ हे मयत शेषेराव हनुमंत डिकले यांचे कायदेशीर वारस असण्याबाबत आक्षेप असलेस जाहीर प्रगटन काढून आक्षेप मागविण्यात आले. परंतु आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

**७.** सदर अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यांचे अवलोकन केले असता, मी या निष्कर्षाप्रत आलेली आहे की, प्रस्तुत अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. वारस प्रमाणपत्र हे फक्त वारस आहे असे ठरवते. ते मयताच्या मिळकतीमध्ये हक्क किंवा अधिकार प्रस्थापित करीत नाही. सबब मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ :-</u>**

**८.** मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष पाहता अर्जदारांचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त झाले आहे. सबब मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १) सखूबाई हनुमंत डिकले (आई), २) आशा शेषेराव डिकले (पत्नी), ३) दिपाली शेषेराव डिकले (मुलगी), ४) मनिषा शेषेराव डिकले (मुलगी), ५)सोनाली शेषेराव डिकले (मुलगी) हे मयत शेषेराव हनुमंत डिकले यांचे

कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

३. आवश्यक कोर्ट फी भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कायद्यातील तरतुदीनुसार, अर्जदार १) सखूबाई हनुमंत डिकले (आई), २) आशा शेषेराव डिकले (पत्नी), ३) दिपाली शेषेराव डिकले (मुलगी), ४) मनिषा शेषेराव डिकले (मुलगी), ५)सोनाली शेषेराव डिकले (मुलगी) हे मयत शेषेराव हनुमंत डिकले यांचे कायदेशीर वारस आहेत, असा वारस दाखला देण्यात यावा.

**स्वाक्षरीत/-**

**दिनांक:** ०३.०८.२०२६
**ठिकाण:** कळंब

(श्रीमती ए.डी.जाधव)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, कळंब.